# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष-३

■ अंक-२६

आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २९ जानेवारी २०२४ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# मुंबई-ठाण्यातील स्वच्छतेचा उपक्रम दिव्यात राबवला जाईल का?

## ठाणे महानगरपालिकेने दिव्यात स्वच्छतेची विशेष मोहीम हाती घ्यायला हवी!




**हे दिव्यात कधी होणार!**






राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मुंबई, ठाण्यात डीप क्लीनिंगचा कौतुकास्पद उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत स्वच्छतेला प्राधान्य दिले जात असताना, दिव्यात मात्र ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडून स्वच्छतेचा बोजवारा उडवला जात आहे. दिवा शहरात स्वच्छतेच्या नावाने बोंब असून जागोजागी कचऱ्याचे साम्राज्य आहे. कचरा वेळेवर उचलला जात नाही.अंतर्गत रस्त्यांना गल्लीबोळात अनेक ठिकाणी कचरा साचलेला दिसतो. मुख्य रस्ते देखील स्वच्छ नसतात.महापालिका प्रशासनाने मुख्यमंत्र्यांनी स्वच्छतेचा घालून दिलेला आदर्श दिव्यात राबवण्याचा प्रयत्न करावा.दिवा शहर अस्वच्छतेपासून मुक्त करावे अशी मागणी नागरिकांची आहे. मात्र दिव्यातील प्रश्नांकडे सहजतेने लक्ष देईल ती ठाणे महापालिका कसली? अशी भावना येथील नागरिकांची आहे!



दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज

www.diwanews.com

सोमवार, दि. २९ जानेवारी २०२४ पान : २

# उलटलेल्या टोमॅटो ट्रकने घोडबंदर रोड पाच तास रोखला



चालकाचा ताबा सुटून अपघात

**ठाणे:** बोरिवली येथे घोडबंदर रोड मार्गे निघालेल्या टोमॅटोच्या ट्रकवरील चालकाचा ताबा सुटून ट्रक पातलीपाडा उड्डाणपुलावर उलटल्याची घटना मंगळवारी पहाटे चार ते सव्वाचार वाजण्याच्या घडली. या अपघातात ट्रकमधील सुमारे २ ते ३ टन टोमॅटो रस्त्यावर पसरून अक्षरशः चिखल झाला होता. तसेच ट्रकमधील तेलही रस्त्यावर सांडल्याने त्याचा परिणाम वाहतुकीवर झाला. सुमारे पाच तासांच्या प्रयत्नानंतर तो उड्डाणपूल वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला. दरम्यान रस्त्यावर पसरलेले टोमॅटो घंटागाडीमध्ये भरण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिले.

महेंद्र गुप्ता यांच्या मालकीच्या ट्रकमधून सुमारे २ ते ३ टन टोमॅटो हे शिरपूर येथून घोडबंदर रोडवरून चालक बोरिवलीला घेऊन निघाला होता. ठाण्यातून जाताना पातलीपाडा उड्डाणपुलावर चालकाचा त्या ट्रकवरील ताबा सुटला आणि तो ट्रक उलटला. या घटनेत ट्रक मधील टोमॅटो रस्त्यावर पसरले तसेच तेल ही सांडले. या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी शहर वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी , आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी , अग्निशमन दलाचे जवान , घनकचरा विभागाचे अधिकारी व कर्मचारी या विभागांनी धाव घेतली. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसून घटनास्थळावरून ट्रक चालक पळून गेला. त्यानंतर अपघातग्रस्त ट्रक हायड्रा मशिनच्या साहाय्याने रोडच्या बाजूला करण्यात आला आहे.

याशिवाय पातलीपाडा उड्डाणपुलावरती पडलेले टोमॅटो जेसीबी मशीनच्या सहाय्याने व घनकचरा विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने उचलून घनकचरा विभागाच्या घंटागाडीमध्ये भरण्यात आले आहेत. तर, टोमॅटो पडून चिखल झालेल्या रोडवरती अग्निशमन दलाच्या जवानांकडून पाणी मारून तो रस्ता साफ करण्यात आला असून सांडलेल्या तेलावर आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचाऱ्यांमार्फत माती पसरविण्यात आली. त्याच्यानंतर पातलीपाडा उड्डाणपूल सुमारे ०५ तासाच्या प्रयत्नानंतर वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## जिम्नॅस्टिक्समध्ये ठाण्याच्या आर्यन दवंडेची सोनेरी हॅट्ट्रिक

### सलग तीन खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्ण पदक पटविणारा खेळाडू



ठाणे : ठाण्याचा खेळाडू आर्यन दवंडे याने अपेक्षेप्रमाणे येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील जिम्नॅस्टिक्स या प्रकारात सोनेरी हॅट्ट्रिक साजरी केली. गेल्या दोन स्पर्धांमध्ये किमान एक सुवर्णपदक जिंकणाऱ्या या खेळाडूने यंदा वैयक्तिक सर्वसाधारण प्रकारांमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली व सुवर्णपदक जिंकले.

आर्यन याच्यापुढे प्रणव मिश्रा (उत्तर प्रदेश) व डी. हर्षित (उत्तर प्रदेश) यांचे आव्हान होते. आर्यन याने ७३.२०० गुणांची कमाई करीत सुवर्ण पदकावर नाव कोरले. प्रणवला ७२.४७० गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर हर्षितने ७१.७०० गुणांसह कांस्यपदक जिंकले. महाराष्ट्राच्या सार्थक राऊळ याला सातवे स्थान मिळाले. त्याने ६९.५६६ गुणांची नोंद केली.

आर्यन व सार्थक हे दोन्ही खेळाडू ठाणे येथे महेंद्र बाभुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. आर्यन हा वैयक्तिक साधन प्रकारांमध्येही सहभागी झाला असून तेथेही त्याच्याकडून महाराष्ट्राला पदकांची अपेक्षा आहे.

आर्यन या अठरा वर्षीय खेळाडूने कनिष्ठ गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत विजेतेपदाचा मान मिळविला आहे. त्याने कनिष्ठ गटाच्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत तसेच जागतिक शालेय क्रीडा स्पर्धांमध्येही भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. फ्लोअर एक्झरसाईज, समांतर बार, डबल बार इत्यादी क्रीडा प्रकारांमध्ये त्याची हुकूमत असून आजपर्यंत राज्य व राष्ट्रीय स्तरावर त्याने भरघोस पदकांची कमाई केली आहे. तो मुलुंड येथील वझे महाविद्यालयात बारावी वाणिज्य शाखेत शिकत आहे.

आर्यन याचे वडील इलेक्ट्रिशियन आहेत. घरात कोणतीही खेळाची पार्श्वभूमी नसताना त्याने जिम्नॅस्टिक सारख्या आव्हानात्मक खेळात चमकदार कारकीर्द घडवली आहे. ज्युनिअर के. जी. पासून तो बाभुळकर यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे. त्याच्याकडील जिम्नॅस्टिक्सकरिता असलेली क्षमता, इच्छाशक्ती व आत्मविश्वास पाहून बाभुळकर यांनी त्याला याच खेळामध्ये स्पर्धात्मक प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आणि त्याने महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावला आहे.

## नाशिक स्थित डॉक्टरच्या खुनाची सुपारी देणारी महिला पोलिसांच्या जाळ्यात

**ठाणे:** मैत्रीपूर्ण संबंधातून ठाण्यातील एका महिलेने नाशिक स्थित डॉक्टराकडे ५० लाखांच्या खंडणीची मागणी सातत्याने लावून धरली. मात्र ती मागणी पूर्ण होत असल्याने त्या डॉक्टराच्या खुनाची सुपारी देणाऱ्या बाळकुम येथील नेहा जाधव उर्फ ज्योत्स्ना अमित पगारे (४७) या महिलेचा डाव बोगस मारेकऱ्याच्या मदतीने ठाणे शहर खंडणी विरोधी पथकाने उधळून लावला . तसेच तिला रविवारी ठाण्यात अटक केली. तर येत्या २४ जानेवारीपर्यंत त्या महिलेला पोलीस कोठडी मिळाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ठाणे शहर खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक शेखर बागडे यांना बाळकुम येथे राहणाऱ्या नेहा जाधव ही महिला नाशिक स्थित डॉक्टर असलेल्या इसमाची सुपारी देवून खुन करण्यासाठी मारेकऱ्याच्या शोधात आहे. त्यावेळी त्यांनी बनावट मारेकरी म्हणून एकास पाठवुन मिळालेल्या बातमीची खातरजमा केली. तद्नंतर जाधव याने बनावट मारेकरी म्हणून पाठविलेल्या इसमास नाशिक स्थित डॉक्टर किरण बेंडाळे यांचा खुन करण्यासाठी तीन लाख रूपयांची सुपारी देत, डॉ किरण बेंडाळे यांचा फोटो, काम करण्याचे ठिकाणाची माहिती, विषारी इंजेक्शन, सिरींज दिले. अशाप्रकारे त्या बनावट मारेकऱ्याने नेहा जाधव यांच्या विरोधात कापुरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर जाधव या महिलेला अटक करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांच्या पथकातील पोलीस निरीक्षक वनिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल तारमळे, श्रीकृष्ण गोरे, भुषण कापडणीस, पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार राठोड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुभाष तावडे, संजय बाबर, पोलीस हवालदार संजय राठोड, सचिन शिंपी, शितल पावसकर, पोलीस शिपाई मयुरी भोसले, अरविंद शेजवळ, पोलीस नाईक भगवान हिवरे या पथकाने केली .

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २९ जानेवारी २०२४


# मराठी भाषा सर्वांना एकत्रित ठेवणारा समान धागा..!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**ठाणे :** मराठी भाषा ही आपली संस्कृती, परंपरा आणि इतिहास आहे. मराठी माणसाची धडाडी, संघर्ष सर्वांना ठाऊक आहे. त्यातूनच मराठी माणूस मोठा होतो. या मराठी विश्व संमेलन-२०२४ च्या माध्यमातून जगभरातील मराठी माणसांना एकत्रित येता आले आहे. म्हणूनच मराठी भाषा सर्वांना एकत्रित ठेवणारा समान धागा आहे, असे उद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नवी मुंबई येथे काढले.

विश्व मराठी संमेलन-२०२४ चा उद्घाटन सोहळा नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्र या ठिकाणी आज संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मराठी भाषा, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई (शहर) पालकमंत्री दीपक केसरकर, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, आमदार मंदा म्हात्रे, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे, माध्यम सल्लागार जयू भाटकर, मराठी भाषा विभागाचे उपसचिव हर्षवर्धन जाधव, राज्य मराठी भाषा कोष मंडळाचे सचिव डॉ.शामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषा विभागाचे मनःपूर्वक अभिनंदन केले व ते म्हणाले, मराठी भाषा आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले होते. विविध परिसंवाद, नाट्य संमेलन, साहित्य संमेलन अशा विविध माध्यमांतून ''माय मराठी'' चा गजर सुरू आहे. मराठी भाषेचे महत्त्व वाढविण्यासाठी याचप्रकारे आयोजित करण्यात आलेला मराठी भाषा पंधरवडाही अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाला. मराठी भाषेचा वापर वाढत आहे. आजच्या पिढीचा कल मराठी भाषेकडे वळविणे गरजेचे आहे मात्र यासाठी मराठी भाषेच्या लेखकांनी आजच्या पिढीची भाषा ओळखून त्याप्रमाणे साहित्य निर्मिती करायला हवी, त्यातून त्यांच्या मनात मराठी भाषेसाठी आपुलकी निर्माण होईल, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्राला देशभरातून तसेच जगभरातून पसंती मिळत आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, जागतिक आर्थिक परिषदेच्या माध्यमातून ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार स्वाक्षरीत झाले आहेत. महाराष्ट्र देशाचे ''ग्रोथ इंजिन'' आहे. महाराष्ट्र प्रगत राज्य आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जगभरात देशाचे नाव उज्वल केले आहे. आपली अर्थव्यवस्था जगात दहाव्या क्रमांकावरून आता पाचव्या क्रमांकावर आली आहे आणि आपले ध्येय आहे ते आपली अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर आणण्याचे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी मांडलेली पाच ट्रिलियन डॉलर संकल्पना पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राचे मोठे योगदान असेल. महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे. याचमुळे परदेशातील अनेक मराठी उद्योजक आपल्या देशात व महाराष्ट्रातही आपले उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक आहेत, त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य हे शासन करील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## २८ जानेवारी रोजी मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर राम करण यादव यांच्या दिवा भेटीत संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटना दिवा यांच्याकडून दिव्यातील रेल्वेच्या समस्यांबाबत निवेदन सादर

**दिवा:- २८ जानेवारीला मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर श्री.राम करण यादव यांनी मध्य रेल्वेच्या पाहणी दौऱ्यात दिवा रेल्वे स्थानकाला भेट दिली. यावेळी त्यांची संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्री विजय भोईर व सहकाऱ्यांनी भेट घेऊन त्यांना सोळा हजार रेल्वे प्रवाशांच्या सह्यांच्या निवेदनावर चर्चा करून दिव्यातील रेल्वे प्रवाशांच्या समस्या मांडल्या.**






विशेष म्हणजे यावेळी विजय भोईर,संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष यांनी जीएम यांच्याशी चर्चा केली. श्री.विजय भोईर यांनी यावेळी त्यांना दिवा सीएसएमटी लोकल चालू होणे अत्यंत गरजेचं कसेआहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर दिव्यात आरक्षण केंद्र आणि कोकणात जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या थांबवणे, तसेच सकाळच्या वेळी कल्याणहून सुटणाऱ्या जलद गाड्यांना दिव्यात थांबा द्यावा ही मागणी देखील केली. यावेळी आपल्या मागण्यांना समर्थन देण्यासाठी उपनगरी रेल्वे प्रवासी महासंघाच्या सरचिटणीस लता अरगडे मॅडमही उपस्थित होत्या. त्यांनी देखील आपल्या दिव्याच्या समस्यांविषयी जीएम यांच्याशी चर्चा केली. यावेळी विनोद भगत,समीर चव्हाण,सचिन भोईर, रोशन भगत, युवराज यादव, प्रफुल साळवी,नितीन कोरगावकर, किरण कोरगावकर, रवी मुणनकर,संदेश सावंत, गोविंद घाडीगावकर इ.संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दिवा शहर पाण्यापासून वंचित असताना बेडेकर इंग्लिश स्कूल येथे लाखो लिटर पाणी वाया, पालिकेचे दुर्लक्ष!



## शिवसेना ठाकरे गटाचे शहर संघटक रोहिदास मुंडे प्रश्नाकडे वेधले लक्ष

**दिवा :-** दिवा शहरातील रिमॉडलिंग नागरिकांना योग्य पाणी पुरवठा करण्याच्या हेतूने की ......?

२२१ करोड रुपये खर्चून रिमॉडलिंग म्हणजेच पाण्याचे नवीन पाईप लाईन्स घाईघाईने (अनियोजीत पद्धतीने) टाकण्यात आल्या ? कारण त्या कामाचे उदघाटन मुख्यमंत्री - एकनाथ संभाजी शिंदे यांच्या हस्ते करायचे होते...!

ठरल्या प्रमाणे त्यांच्या हस्ते त्या कामाचे उदघाटनही करण्यात आले, जवळ जवळ ४२ ते ४४ पाणी दिवेकरांसाठी असतानाही मग आजही दिवा शहरातील अर्ध्या अधिक भागात पाणी पुरवठा सुरळीत का नाही ? असा सवाल रोहिदास मुंडे यांनी विचारला आहे.

सत्ताधाऱ्यांचा नियोजन शून्य मनमानी कारभारच.. उद्घाटनाच्या एक दिवसा अगोदर करण्यात आलेल्या नवीन पाईप लाईन च्या टेस्टिंग दरम्यान या पाण्याच्या लाईन्स दिवा-आगासन रोड वरील विकास म्हात्रे गेट समोर मोठ्या प्रमाणात लिकेज असल्याचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वायरल झाले व नेटकऱ्यांनी सत्ताधाऱ्यांना लाखोली वाहिली तेव्हा रातोरात नवीन बनवलेल्या रस्त्याची तोडफोड करत युद्धपातळीवर पाईप लाईन दुरुस्त करून रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते.

पुन्हा एकदा दिवा शहरात आगासन गेट जवळ पुन्हा प्रयत्न फसला... आणि आगासन रेल्वे फाटक जवळ पुन्हा एकदा पाण्याच्या लाईनी फुटल्या आणि काँक्रेट रस्त्याच्या आतून डिव्हायडर मधून पाणी बाहेर येऊ लागले. म्हणजे यात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी ही झालीच पाहिजे टक्केवारीच्या नादात दिव्याचा विकास होत नाही सत्ताधारी विकासाच्या नावाने बोंबा मारत असले तरी यात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात झाला हे आम्ही वारंवार निदर्शनास महापालिकेच्या आणून दिले होते असे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे. ठाणे महापालिकेने दिव्यात होणाऱ्या विकास कामाबद्दल डोळ्यावरती पट्टी बांधलेली असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. आज बेडेकर नगर येथे बेडेकर इंग्लिश स्कूल येथे मोठ्या प्रमाणात पाणी लिकेज होऊन रस्त्यावर पाणी साचलेले परंतु महापालिकेच्या पाणी खात्याच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असून एकीकडे नागरिक पाण्यापासून वंचित असताना लाखो लिटर पाणी वाया जात आहे .तरी याची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी केली आहे.

# प्रभू श्रीरामाच्या मूर्ती प्रतिष्ठापनेत आदिवासी म्हणून वगळले

## हा फक्त आदिवासींचा अपमान नसून देशाचा अपमान

### आदिवासी बांधव राष्ट्रपतींची भेट घेऊन खंत व्यक्त करणार

**ठाणे :** पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते २२ जानेवारीला आयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराचे लोकार्पण झाले. या लोकार्पण सोहळ्यास अनेक राजकीय नेतेमंडळी, अभिनेते या मंडळींना बोलावण्यात आले. पण, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या आदिवासी असल्यानेच त्यांना बोलावण्यात आले नाही. याचा निषेधार्थ प्रजासत्ताक दिनी आदिवासी क्रांती सेनेने त्यांच्या ठाण्यातील राममारुती रोड येथील कार्यालयाच्या आवारात आंदोलन केले. यावेळी बोलताना आदिवासी क्रांती सेनेचे अध्यक्ष अनिल भांगले यांनी हा फक्त आदिवासींचा अपमान नसून देशाचा अपमान आहे, असा आरोप करत, याबाबत महाराष्ट्रातील आदिवासी बांधव राष्ट्रपतींची भेट घेऊन खंत व्यक्त करणार आहे. असेही म्हटले आहे.

या सोहळ्यास अनेकांना आमंत्रणे देण्यात आली होती. अनेकांकडून हे आमंत्रण फेटाळण्यात आले होते. पण, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण देण्यात आले नाही. त्या निषेधार्थ प्रजासत्ताक दिनी आदिवासी क्रांती सेनेने महिलांनी हातात संविधानाच्या प्रती घेऊन मूक निदर्शने केली. या आंदोलनात आदिवासी क्रांती सेनेच्या मुलुंड महिलाध्यक्षा गीता भांगरे, उप तालुकाध्यक्षा सुनिता डोगडे, ठाणे शहराध्यक्षा नताशा सोनकर, सुनिता सुपे, यशोदा गंवादे आदी उपस्थित होते.

प्रभू रामाने वनवासात शबरी या आदिवासी महिलेची उष्टी बोरे खाल्ली. मात्र, इथे आदिवासी असल्यानेच राष्ट्रपतींना बोलावण्यात आले नाही. या आधीही संसदेच्या नवीन इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यातही त्यांना बोलावण्यात आले नव्हते. एकीकडे उत्तर प्रदेशचे प्रथम नागरिक म्हणून तेथील राज्यपालांना बोलावण्यात येते. मात्र, देशाच्या प्रथम नागरिकास बोलावण्यात येत नाही. असे खंत आदिवासी क्रांती सेनेचे अध्यक्ष अनिल भांगले यांनी व्यक्त केली. पुढे बोलताना, हा कार्यक्रम जरी रामजन्मभूमी न्यासाने आयोजित केला असला तरी त्यावर पंतप्रधान कार्यालयाचा अंकुश होता. म्हणजेच जाणीवपूर्वक द्रौपदी मुर्मू यांना बोलावण्यात आले नाही. हा फक्त आदिवासींचा अपमान नसून देशाचा अपमान आहे, असा आरोप करून आपण आदिवासींचे शिष्टमंडळ घेऊन राष्ट्रपतींची भेट घेऊन खंत व्यक्त करणार आहोत, असे शेवटी त्यांनी सांगितले.



# रत्नागिरी जिल्ह्यातील विविध विकासकामे तातडीने मार्गी लावावीत - क्रीडा व बंदरे विकास मंत्री संजय बनसोडे

मुंबई: आर्थिक वर्ष संपण्यास दोन महिने शिल्लक असल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील क्रीडा व बंदरे विभागाची विविध विकासकामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश क्रीडा, युवक कल्याण व बंदरे विकास मंत्री संजय बनसोडे यांनी दिले.

उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या मंत्रालयातील दालनात रत्नागिरी जिल्ह्यातील विविध विकासकामांचा मंत्री श्री. बनसोडे यांनी आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला बंदरे विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव पराग जैन, राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, तसेच आमदार श्री. दळवी, किरण सामंत उपस्थित होते.

भगवती क्रूझ टर्मिनल विकास प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता मिळाली असून प्रस्ताव नियोजन विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता मिळाल्यामुळे वित्त विभागाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया राबविण्यास सुरुवात केली आहे. राजीवाडा खाडीतील गाळ काढण्याच्या कामाबाबत मत्स्य व्यवसाय विकास विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्याचबरोबर बंदर जोड रस्ते, जेट्टी दुरुस्ती, कुरणवाडी जेट्टी ते मांडवा रस्ता तयार करणे आदी कामांच्या तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि. २९ जानेवारी २०२४

पान : ५

www.diwanews.com

# आता मराठा आरक्षण मिळण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात मतदान करा



**ठाणे:– केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या विरोधात मतदान करणे हाच मराठा आरक्षण मिळवण्याचा खरा मार्ग आहे... ही शपथ घ्या! ‘‘मराठा आरक्षण मिळेपर्यंत मी सत्ताधाऱ्यांना मत देणार नाही‘‘ अशा आशयाचे खरमरीत ट्विट भाजपचे माजी ठाणे उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांनी करत भाजपच्या केंद्र व राज्य सरकारला घरचा आहेर दिला आहे.**

## भाजपचे माजी ठाणे उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांचे मराठा समाजाला आवाहन

मराठा आरक्षणावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मनोज जरांगे यांनी मराठा समाजाची दिशाभूल केली असा आरोप होऊ लागल्यानंतर निलेश चव्हाण यांचे ट्विट चर्चेत आहे.

याबाबत निलेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, कालच्या निर्णयाचा मराठा समाजाला कोणताही फायदा झालेला नसून मराठा समाज आरक्षणापासून कोसो दूर आहे व आता जी प्रक्रिया राबविण्यात येत आहे, ती प्रक्रिया निवडणुकीनंतर टिकेल काय ? ज्यांना १० वर्षे दिलीत ते लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर पुन्हा मराठा समाजाला फसवत आहेत याबद्दल तिळमात्र शंका नाही.

शिवाय ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांना ओबीसींच्या आरक्षणात कुणबी म्हणून आरक्षण मिळणार असल्याने संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण दिले असे मुख्यमंत्री कसे काय म्हणू शकतात ? असाही खरमरीत सवाल निलेश चव्हाण यांनी विचारला आहे. जर मिळणारे आरक्षण हे काही कुणबी नोंदी सापडलेल्या लोकांना मिळणार असेल तर ते कुणबी आरक्षण आहे, त्याला मराठा आरक्षण म्हणता येणार नाही.

सरसकट मराठा समाजाला आरक्षण देणार असा जो शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला होता व त्यांनी शिवरायांची शपथ घेऊन तो शब्द दिला होता, मात्र हा शब्द मुख्यमंत्र्यांनी पाळलेला नसताना स्वतःची पाठ थोपटण्याचा प्रकार बरोबर नाही असेही ते म्हणाले. केंद्रात मोदींचे सरकार आणि राज्यात भाजपाचे सरकार असताना जर ते मराठा समाजाला न्याय देणार नसतील तर त्यांची सत्ता उलथवून टाकण्याचे काम करण्यासाठी त्यांच्या विरोधात मतदान करणे हाच मराठा आरक्षण मिळवण्याचा मार्ग आहे त्यासाठी मोर्चा काढण्यापेक्षा मोबाईलच्या डिपी वर व घराच्या दरवाजावर शपथेची पाटी लावावी असे आवाहन त्यांनी सकल मराठा समाजाला केले आहे.

मराठा आणि ओबीसी समाजांमध्ये वाद न लावता, मराठा समाजाचा समावेश ओबीसीत होत नाही तोपर्यंत यांना मतदान करू नये असे आवाहन त्यांनी संपूर्ण मराठा समाजाला केले आहे.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या यादीतून वगळलेल्या सात खेळांचा पुन्हा समावेश करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश



**मुंबई :** शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराकरिता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या गोल्फ, पॉवरलिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलियर्डस ॲण्ड स्नूकर, यॉटिंग आणि इक्वेस्टेरियन या सात क्रीडा प्रकारांना पुन्हा शिवछत्रपती पुरस्कारासाठी पात्र ठरवण्यात यावे. तसेच जिम्नॅस्टिकमधील उपप्रकार असलेल्या एरोबिक्स व ॲक्रोबॅटिक्स या क्रीडा प्रकारांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या यादीत नव्याने सामावेश करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले. यंदाच्या (सन २०२२-२०२३) पुरस्कारांसाठी फेरसमाविष्ट केलेल्या क्रीडा प्रकारातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने तातडीने मागवून तेही विचारात घ्यावेत, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

राज्य शासनाने अलिकडे जारी केलेल्या सुधारित शासन निर्णयात, गोल्फ, पॉवरलिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलियर्डस ॲण्ड स्नूकर, यॉटिंग आणि इक्वेस्टेरियन या सात क्रीडाप्रकारांना वगळण्यात आले होते. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या खेळांच्या संघटनांनी त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्याबाबत तसेच त्यांच्या खेळांचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी पात्र क्रीडाप्रकारांमध्ये समावेश करण्याबाबत क्रीडा संचालनालयास पत्रव्यवहार केला होता, त्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष श्री.पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, उद्योग मंत्री उदय सामंत, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे क्रीडा विभागाचे आयुक्त सुहास दिवसे, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे उपाध्यक्ष संजय शेटे, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), अरुण केदार, अजित सावंत (कॅरम), संजय सरदेसाई, संजय माधव (पॉवर लिफ्टिंग), महेंद्र चेंबूरकर ( जिम्नॅस्टिक्स), देवेंद्र जोशी, क्षितिज वेदक (बिलियड्‌र्स आणि स्नूकर), विजय झगडे, राजेश सावंत (बॉडीबिल्डिंग), विठ्ठल शिरगावकर (मॉडर्न नेन्थोलॉन) आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, कोणताही खेळाडू तो खेळत असलेल्या क्रीडा प्रकारात यश मिळविण्यासाठी त्याची उमेदीची वर्षे खर्च करतो. आपले सर्वस्व पणाला लावतो. आपल्या कौशल्य, मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्यासह देशाचे नाव उज्ज्वल करतो. अशा खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीचा गौरव करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने शिवछत्रपती पुरस्कार देण्यात येतात. त्यामुळे कुठल्याही खेळावर आणि खेळाडूंवर अन्याय होऊन चालणार नाही.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी पात्र असलेल्या ४४ खेळांपैकी, वगळण्यात आलेल्या इक्वेस्टेरियन, गोल्फ, पॉवर लिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलियर्डस ॲण्ड स्नूकर, यॉटिंग या सात खेळांना पुन्हा यादीत सामावून घेण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. जिम्नॅस्टिक खेळामधील उपप्रकार असणाऱ्या एरोबिक्स व ॲक्रोबॅटिक्स या क्रीडा प्रकारांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या पात्र यादीत नव्याने समावेश करण्याचे ठरविण्यात आले. सन २०२२-२३ या वर्षातील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. त्यांची मुदत २२ जानेवारीपर्यंतच होती. ही मुदत वाढवून या नव्याने समाविष्ट केलेल्या खेळांसाठीचे अर्ज ऑनलाईन मागविण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

# देवरुख-संगमेश्वर-साखरपा रस्त्याची दुरुस्ती तातडीने होणार!

## संपूर्ण रस्त्याला सील कोटही टाकण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे लेखी आश्वासन




## गाव विकास समिती संघटनेच्या रस्ता दुरुस्ती बाबतच्या 'जवाब दो' धरणे आंदोलनाला यश, गॅरंटी अंतर्गत दुरुस्तीचे काम होणार

देवरुख:-देवरुख - संगमेश्वर - साखरपा रस्त्याची झालेली दुरवस्था गॅरेंटी अंतर्गत दुरुस्त करून द्यावी व संपूर्ण रस्त्याला सील कोट मारावा या मागणीसाठी गाव विकास समिती,रत्नागिरी जिल्हा संघटनेमार्फत साडवली येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला सकाळीच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता पूजा इंगवले मॅडम यांनी भेट देऊन गाव विकास समितीच्या सर्व मागण्या मान्य करत असल्याचे लेखी पत्र दिले.

गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड, संघटन प्रमुख सुहास खंडागळे, उपाध्यक्ष राहुल यादव, जिल्हाध्यक्ष श्यामकर्ण भोपळकर व ॲड. सुनील खंडागळे यांच्या उपस्थितीत संगमेश्वर साखरपा देवरुख रस्त्याच्या दुरावस्थेबाबत जवाब दो धरणे आंदोलन पार पडले. रस्त्याला ५ वर्षाची हमी असताना अवघ्या तीन वर्षांत रस्ता खराब कसा झाला? असा सवाल करत गाव विकास समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाने घेत आंदोलन स्थळी भेट दिली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देवरुख विभाग उपअभियंता पूजा इंगवले मॅडम यांनी गाव विकास समितीचे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष श्याम कर्ण भोपळकर यांना दिलेल्या लेखी पत्रात म्हटले आहे की,निविदा शर्तीनुसार सदर कामाचे दोष व दायित्व कालावधी ही ५ वर्षाची असून सदरचे काम हे मार्च २०२२ ला पूर्ण करण्यात आले आहे. सदरचे काम हे दोष व दायित्व कालावधीत असल्याने सदर कामाची दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची आहे.

रस्ता दुरुस्ती बाबत ठेकेदाराला सूचना देण्यात येतील.सदर दुरुस्तीचे काम १ फेब्रुवारी पासून चालू करण्यात येईल तसेच सील कोटचे काम मार्च अखरे पर्यंत करणेत येईल असे लेखी पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाने गाव विकास समितीचे जिल्हाध्यक्ष भोपळकर यांना दिले आहे. जमावबंदीच्या आदेशाचे पालन करत निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला अनेक नागरिकांनी भेटी दिल्या. त्याचबरोबर गाव विकास समितीचे पदाधिकारी सरचिटणीस डॉ. मंगेश कांगणे, सुरेंद्र काबदुले, महिला संघटना अध्यक्षा दीक्षा खंडागळे, महिला संघटना सरचिटणीस ईश्वरी यादव, जिल्हा उपाध्यक्ष मुझम्मील काझी,जिल्हा संघटक, संगमेश्वर तालुका उपाध्यक्ष दैवत पवार यांनी या आंदोलनाला प्रत्यक्ष भेट देत भोपळकर यांना समर्थन दिले.

> ***संगमेश्वर-साखरपा रस्त्याला पाच वर्षाची गॅरंटी असतानाही रस्ता खराब झाला.याविरोधात गाव विकास समितीने आवाज उठविला.२६ जानेवारी रोजी निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या आंदोलनाला प्राथमिक यश आले असून काम पूर्ण होई पर्यंत पाठपुरावा सुरू राहील!***
>
> ***- श्यामकर्ण भोपळकर,***
> ***जिल्हा अध्यक्ष गाव विकास समिती, रत्नागिरी जिल्हा***

## मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम ठाणे जिल्ह्यात युध्दपातळीवर सुरु

### आतापर्यंत झाले ३ हजार ५४२ कुणबी दाखल्यांचे वाटप

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. आजपर्यंत एकूण १ लाख ३६ हजार १०१ नोंदी आढळून आल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक ५८ हजार ३७४ नोंदी या शहापूर तालुक्यात झाल्या असून मीरा- भाईंदरमध्ये फक्त ८ नोंदी पुढे आल्या आहे. तर आजपर्यंत एकूण ३ हजार ५४२ कुणबी दाखले वाटप करण्यात आले आहे. याशिवाय ज्या गावात कुणबी नोंदी आढळून आल्या आहेत, तेथील नागरिकांनी नोंदीनुसार जात प्रमाणपत्र घ्यावे, असे आवाहन ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

शासन निर्णय क्रमांक मआसु-२०२३/ प्र.क्र.०३/१६-क , ०३ नोव्हेंबर २०२३ अन्वये संदीप शिंदे (निवृत्त) समितीच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीद्वारे संपूर्ण राज्यामध्ये सन १९६७ पूर्वीच्या कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीच्या नोंदी शोधणे तसेच नोंदी आढळलेले अभिलेख संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, संबंधित व्यक्तिंना जात प्रमाणपत्राचे वाटप करणे इत्यादी सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार ठाणे जिल्हयात सर्व महानगरपालिका, तहसिल कार्यालय, उपविभागीय कार्यालय, नगरपरिषद, नगरपंचायत, सह निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद शिक्षण विभाग स्तरावर कुणबी नोंदी शोध मोहीम सुरु आहे. त्यानुसार, जिल्हयातील ठाणे तालुक्यात ९ हजार ४६२, भिवंडी-२५ हजार ६५४, कल्याण-८ हजार ५६४, उल्हासनगर- ३६, अंबरनाथ-१ हजार १८५, शहापूर ५८ हजार ३७४, मुरबाड-३२ हजार ८१४, मीरा-भाईंदर- ८ अशा एकूण १ लाख ३६ हजार १०१ या नोंदी पुढे आल्या असून त्या तालुका स्तरावर स्कॅनिंग करुन ठाणे जिल्हयातील .. या वेबसाईटवर अपलोड करण्यात आल्या आहेत. तसेच ज्या माडी माषेमध्ये नोंदी आढळून आल्या आहेत, त्यांचे भाषांतर करुन वेबसाईटवर अपलोड करण्यात आले. या नोंदीची यादी तालुक्यातील गावनिहाय ग्रामपंचायतींमध्ये प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यातच २४ ऑक्टोबर २३ पासून आजपर्यंत एकूण ३ हजार ५४२ कुणबी दाखले उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत संबंधितांना वाटप करण्यात आले आहेत. तसेच ज्या गावात कुणबी नोंदी आढळल्या आहेत अशा गावांच्या ठिकाणी शिबीर आयोजित करुन दाखले वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.



# दिव्यात भाजप आयोजित श्री राम प्राणप्रतिष्ठा निमित्त महाआरती उत्साहात संपन्न







ठाणे:- भारतीय जनता पार्टी दिवा शहर, आयोजित येथे दिवा रेल्वे स्टेशन येथे दिवेकरांच्या उपस्थितीत भव्य महाआरती संपन्न झाली. यावेळी दिवा भाजपचे दिवा-शिळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, यांच्या उपस्थितीत चिंतामण भोईर यांनी प्रभू श्री रामाच्या प्रतिमेचे मनोभावे पूजन केले. यावेळी श्री रामाची महाआरती करण्यात आली. दिव्यातील नागरिकांनी जय श्रीराम घोषणांनी दिल्या.याप्रसंगी भाजपचे विजय भोईर, अशोक पाटील, विनोद भगत, रोशन भगत, समीर चव्हाण, सतीश केळशीकर, महिला अध्यक्षा सपना भगत, रेशमा पवार, सीमा भगत, युवराज यादव, गौरीशंकर पटवा, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते महिला उपस्थित होते.



दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी
आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

## आगीत दोन घरांचे मुख्य दरवाजे जळाले

**ठाणे:** माजिवडा, ओसवाल पार्क, या ठिकाणी बिल्डिंग नं. १८ मधील जिन्याच्या पॅसेजमध्ये इंटरनेट व सीसीटीव्ही केबलला आग लागल्याची घटना समोर आली. या घटनेत रूम नंबर २१ आणि २४ या दोन घरांच्या मुख्य दरवाज्याचे जळून नुकसान झाले असून ही आग २० मिनिटात नियंत्रणात आणण्यात स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण , आपत्ती व्यवस्थापन तसेच अग्निशमन दल या विभागांनी धाव घेतली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसून सुहास फडके आणि अनिरुद्ध केळकर यांच्या मालकीच्या घराचे दरवाज्याचे जळून नुकसान झाले आहे.

